**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/२३/२०२५
दिनांक – ०७.०३.२०२५

**प्रति,**

१. श्रीमती हिराबाई सिदा कोळी मयत मृत्यूपत्राने मालक
अ. नंदू बापू कोळी
रा. येळवी, ता.जत, सांगली ..... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. स्मिता अशोक घोंगडे

२. दादासाहेब दगडू काकेकर
अ.क्र. १ रा. बी ९०६, नवनीत सी एस एस अधेंरी पश्चिम मुंबई ४०००५८
अ.क्र.२ रा. कागष्ट ता.मंगळवेढा जि.सोलापूर ...... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे. येळवी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर २६४ या मिळकती संदर्भातील फेरफार नंबर ३७६३, दिनांक ०२.०१.२०२५, प्रकरणी मंडळ अधिकारी, शेगांव यांनी क्र.तक्रार/रजि/१६/२०२४ दिनांक ०२.०१.२०२५ रोजी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपिल मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे. येळवी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर २६४ या मिळकती संदर्भातील फेरफार नंबर ३७६३, दिनांक ०२.०१.२०२५, प्रकरणी मंडळ अधिकारी, शेगांव यांनी क्र.तक्रार/रजि/१६/२०२४ दिनांक ०२.०१.२०२५ रोजी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

२. वादातीत मिळकतीचा खरेदी दस्त क्र.१०९९ दिनांक २३.०७.२०२४ ने जाबदार ०१ यांनी जाबदर ०२ यांचेकडून गट नंबर २६४ मधील ०.६२ हे.आर क्षेत्र खरेदी घेतलेले आहे. अपिलार्थी यांचे म्हणण्यान्वये वाद मिळकत ही हिराबाई सिदा कोळी यांची असून हिराबाई कोळी यांनी अपिलर्थी यांना नोंदणीकृत मृत्यूपत्र/इच्छापत्र दस्त क्र.२०८८/१५ दिनांक ०६.०६.२०१५करून दिलेला आहे. त्यामुळे ते उक्त मिळकतीचे मालक झालेले आहेत. त्यामुळे झालेला खरेदीदस्त पोकळ आहे. त्यामुळे खरेदी दस्ताची नोंद रद्द करणेची विनंती केली आहे. वास्तविक अपिलार्थी यांना ज्यांनी मृत्यूपत्र करून दिले त्या मयत झालेनंतर मृत्यूपत्रची नोंद का करून घेतली नाही. याबाबत काही एक युक्तिवादामध्ये नमूद करत नाहीत.

३. मंडळ अधिकारी, शेगांव यांनी फेरफार क्रमांक ३७६३ मंजूर करण्याचे निर्णयावर अपिलार्थी अपील दाखल करण्याकामी त्यांचा हितसंबंध काय हे समजून येत नाही. त्यापेक्षाही सदरचा हितसंबंध ते निश्चित होतील असे कुठेही पुरावे जोडत नाहीत. उपरोक्त विवेचनाअंती अपिलार्थीचे

अपील हे गैरवाजवी ठरत आहे तसेच हितसंबंध असल्याशिवाय केलेले अपील हे कायद्याचे कसोटीवर टिकू शकत नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम ९६ नुसार हितसंबंधित व्यक्तीच केवळ अपील दाखल करू शकते. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्याशिवाय पर्याय रहात नसल्याने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**प्रस्तुत अपिल दाखल करून घेणेच्या मुद्द्यावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण – जत
दिनांक - ०७.०३.२०२५

प्रत –तहसिलदार जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.